**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि.**

**दिनांक : 23.06.2024** **रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. **पोलाद, लोह आणि ॲल्युमिनियमपासून निर्मित दुधाच्या कॅनवर 12 टक्के एकसमान जीएसटी दराची शिफारस.**
2. **प्राचीन परंपरा, आधुनिक विज्ञान, आणि तंत्रज्ञान यांचा संगम घडवून आणत भारतीयांनी जगासमोर एक नवा आदर्श घालून दिला असल्याचं डॉक्टर जितेंद्रसिंह यांचं प्रतिपादन.**
3. **राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या परीक्षांवर उच्चस्तरीय समिती देखरेख करणार.**
4. **राज्यात आज ठिकठिकाणी जागतिक ऑलिम्पिक दिनाचं आयोजन.**

**आणि**

5. **टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये बांग्लादेशवर मात करत भारत उपांत्य फेरीत दाखल.**

**वस्तू सेवा कर बैठक**

जीएसटी परिषदेनं पोलाद, लोह आणि ॲल्युमिनियमपासूननिर्मित दुधाच्या कॅनवर 12 टक्के एकसमान जीएसटी दराची शिफारस केली आहे. त्रेपनाव्या जीएसटी परिषदेच्या बैठकीनंतर अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी नवी दिल्ली इथं काल माध्यमांशी बोलताना रेल्वे फलाट तिकिट, विश्रांती कक्ष आणि प्रतीक्षा कक्ष आणि बॅटरीवर चालणाऱ्या कार सेवांवर कोणताही जीएसटी लागणार नाही असं जाहीर केलं. बायोमेट्रिक-आधारित आधार प्रमाणीकरण अखिल भारतीय आधारावर लागू केलं जाणार आहे. खोट्या इनव्हॉइसद्वारे केलेल्या इनपुट टॅक्स क्रेडिटच्या दाव्यांना आळा घालण्यात याची मदत होईल अशी अपेक्षा असल्याचं त्या म्हणाल्या.

**डॉ. जितेंद्रसिंह**

आपली प्राचीन समृध्द परंपरा आणि आधुनिक विज्ञान, तंत्रज्ञान यांचा सुरेख संगम घडवून भारतीयांनी गेल्या काही वर्षात जगासमोर एक नवा आदर्श घालून दिला असल्याचं प्रतिपादन केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि पृथ्वी विज्ञान राज्यमंत्री डॉक्टर जितेंद्रसिंह यांनी काल पुण्यात केलं. पुण्याजवळील लोणी काळभोर इथल्या एम आय टी संस्थेत, विज्ञान भारती या संघटनेच्या 6 व्या राष्ट्रीय अधिवेशनातील अध्यात्म आणि विज्ञान या विषयावरील परिसंवादात ते काल बोलत होते.

देशभरातून सुमारे पंधराशे प्रतिनिधी या अधिवेशनाला उपस्थित आहेत. आज या अधिवेशनाचा समारोप होणार आहे. यावेळी बोलताना जितेंद्रसिंह म्हणाले की, भारताची आयुर्वेदासारखी प्राचीन विद्या कोरोना काळात खऱ्या अर्थाने उपयोगी पडली आणि कोरोनावर जगभर झालेल्या उपचार पद्धतीमध्ये आयुर्वेदिक औषधांचा प्रामुख्याने वापर केला गेला. जागतिक पातळीवर संशोधन क्षेत्रात 2014 मध्ये 81 व्या क्रमांकावर असलेला भारत 2022 मध्ये 40 व्या स्थानावर पोहोचला असून स्टार्टअप सारख्या उद्योगांचा त्यात मोलाचा वाटा असल्याचं त्यांनी सांगितलं. भारताला 750 किलोमीटर लांबीचा समृध्द सागर किनारा लाभला असून खनिज, धातू आणि जैववैविध्य यातील संशोधनाद्वारे त्याचबरोबर माशांच्या निर्यातीत भारत अग्रक्रमावर पोहोचेल असा विश्वासदेखील जितेंद्रसिंह यांनी यावेळी व्यक्त केला.

**राष्ट्रीय चाचणी परीक्षा**

राष्ट्रीय चाचणी संस्थेद्वारे घेतल्या जाणाऱ्या परीक्षा पारदर्शक, सुरळीत आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडाव्यात यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण विभागाने तज्ञांचा सहभाग असलेली एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. परीक्षा प्रक्रियेच्या यंत्रणेतील आवश्यक सुधारणा, माहितीसाठ्याच्या सुरक्षा विषयक नियम सुधारणा तसंच राष्ट्रीय चाचणी संस्थेची संरचना आणि कामकाज या मुद्यांवरच्या शिफारसी ही समिती विभागाला सादर करेल आणि या संदर्भातील विषयांवर विचारमंथन करेल. ही समिती आपल्या मदतीसाठी इतर कोणत्याही विषयतज्ज्ञाची निवड करू शकणार आहे. हा आदेश जारी झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत समिती आपला अहवाल मंत्रालयाला सादर करेल. विद्यापीठ अनुदान आय़ोगानं या निर्णयाचं स्वागत केलं आहे. दरम्यान, राष्ट्रीय चाचणी संस्थेचे संचालक सुबोधकुमार सिंग यांना पदावरुन दूर करण्यात आलं असून त्यांच्या जागी भारतीय व्यापार प्रोत्साहन संघटनेचे अध्यक्ष प्रदीपसिंग खरोला यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. दरम्यान नीट परिक्षेतील घोटाळ्यासंदर्भात बिहार पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे.

**गडकरी**

शैक्षणिक संस्थांमध्ये व्यावसायिक आणि शैक्षणिक ज्ञानातून निर्माण होणारे संशोधन आणि परिसरातील विकास हे परस्पर पूरक असायला हवे, उद्योग विकासाकरिता त्या क्षेत्रातील उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यामध्ये समन्वय आणि संवाद असणं आवश्यक आहे असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल केलं. नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारे आयोजित भारतीय उद्योग महासंघाच्या विदर्भ शाखेद्वारे आयोजित ' विदर्भामध्ये शैक्षणिक धोरणाला चालना ' या विषयावरील कार्यक्रमात ते बोलत होते.

उद्योगसमूहांनी स्टार्टअप परिसंस्था , कच्च्या मालाला तसंच स्थानिक मनुष्यबळाला योग्य रीतीनं चालना देणे आवश्यक असल्याचं गडकरी यांनी यावेळी नमूद केलं. नागपूरमध्ये मदर डेअरीच्या साडे चारशे कोटी रुपयांच्या प्रकल्पामुळे तिथल्या दुग्धविकासाला चालना मिळणार असून 5 ते 7 लाख शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली.

**या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.**

**मुख्यमंत्री**

शिक्षकांनी फक्त शिकवण्याचंच काम केलं पाहिजे. शिक्षकांना शिकवण्या व्यतिरिक्त इतरही कामे दिली जातात या संदर्भात राज्य सरकार विचार करत असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर लोणी इथं आयोजित संस्थाचालक- मुख्याध्यापक-शिक्षक यांच्या मेळाव्यात ते काल बोलत होते. तत्पूर्वी, राज्यात आरक्षणावरून सुरू असलेल्या आंदोलनासंदर्भात मंत्रिमंडळाच्या येत्या बैठकीत त्यावर नक्कीच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी काल त्यांच्या नाशिक दौऱ्यात दिली. नाशिक शिक्षक मतदारसंघाचे उमेदवार किशोर दराडे यांच्या प्रचारासाठी आले असताना; जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील विविध शैक्षणिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना त्यांनी संबोधित केलं. मुख्यमंत्र्यांनी संत निवृत्तीनाथ महाराजांच्या दिंडीतील वारकऱ्यांशीही संवाद साधला.

**फडणवीस-गडचिरोली**

गडचिरोली जिल्ह्यातल्या नक्षल चळवळीतील राजकीय आणि लष्करी हालचालींचा प्रभारी आणि वरिष्ठ नक्षल नेता नांगसू मनकू तुमरेटी उर्फ गिरीधर उर्फ बिच्चू यानं पत्नी संगीतासह ; गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल शरणागती पत्करली. गिरीधरवर १७९ गुन्ह्यांची नोंद आहे. त्यात ८६ चकमकी आणि १५ जाळपोळीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनान त्याला पकडण्यासाठी २५ लाख रुपये बक्षीस जाहीर केलं होतं. नक्षलवाद्यांचा संविधानावर विश्वास नाही. ते हिंसेवर विश्वास ठेवून निरपराध नागरिकांचा बळी घेतात. त्यामुळे आमचा त्यांना विरोध आहे. पोलिसांनी सोशल पोलिसींगद्वारे शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिल्यानं दुर्गम भागातील आदिवासींना नक्षल्यांपेक्षा पोलिस जवळचे वाटतात. म्हणून शरण येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. गिरीधर हा मोठा नक्षल नेता मुख्य प्रवाहात आल्यानं नक्षल चळवळ जवळपास संपली आहे, असं फडणवीस म्हणाले. विविध चकमकींमध्ये धाडसी कामगिरी केल्याबद्दल अहेरीचे अतिरिक्त पोलिस अधीक्षक यतीश देशमुख, सी-६० पथकाचे कमांडर वासुदेव मडावी, समय्या आसम यांचा याप्रसंगी फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**लक्ष्मण हाके उपोषण**

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने काल जालना जिल्ह्यातल्या वडीगोद्री इथं ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि वाघमारे यांची भेट घेतली. या शिष्टमंडळात मंत्री छगन भुजबळ, धनंजय मुंडे, गिरीश महाजन यांच्यासह १२ जणांचा समावेश होता. यावेळी मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, असं आश्वासन सरकारनं  दिलं. त्यानंतर हाके यांनी उपोषण तात्पुरतं स्थगित केलं आहे.

**कार्यकारिणी**

अखिल भारतीय साहित्य परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिका डॉक्टर उमा कुलकर्णी यांची फेरनिवड  करण्यात आली आहे. युवा लेखक अहमद शेख कार्याध्यक्ष तर प्रांत उपाध्यक्षपदी प्राध्यापक डॉक्टर अरुण ठोके आणि प्राध्यापक बिराजदार यांची  निवड करण्यात आली. पुण्यात काल आयोजित कवी कट्टा या कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री नितीन केळकर यांनी पश्चिम महाराष्ट्राबरोबरच या वर्षीची पुणे महानगर कार्यकारिणीही घोषित केली. काव्यकट्ट्यावर 25 कवींनी  कविता सादर केल्या. त्यांना रसिक श्रोत्यांची भरभरून दाद मिळाली.

**ऑलिम्पिक**

महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटना आणि महाराष्ट्र क्रीडा संचालना लयाच्यावतीनं आज जागतिक ऑलिम्पिक दिन साजरा केला जात आहे. महाराष्ट्राचं नाव उज्ज्वल करणाऱ्या ऑलिम्पियन आणि आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सन्मान, ऑलिम्पिक दौड, हॉकी स्पर्धा अशा विविध कार्यक्रमांनी हा दिवस साजरा केला जाणार आहे. राज्याच्या अनेक जिल्ह्यांमध्ये विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यात म्हाळुंगे बालेवाडी क्रीडा संकुल इथं ३ आणि ५ किलो मीटर धावण्याची शर्यत थोड्याच वेळात सुरु होत आहे. तर सकाळी ८ वाजता वाजता डेक्कन जिमखाना ते म्हात्रे पूल डी. पी. रोड अशा आणखी एका मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आलं आहे. स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर अनेक खेळांचं सादरीकरण देखील करण्यात येणार आहे.

**T20 विश्वचषक**

पुरुषांच्या वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेटमध्ये काल अँटिग्वा इथं भारतानं बांगलादेशचा 50 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना भारतानं 5 बाद 196 धावा केल्या होत्या. तर बांगलादेशनं 8 बाद 146 धावा केल्या. भारताकडून हार्दिक पांड्याने 27 चेंडूत 50 धावा केल्या, तर ऋषभ पंतने 28 चेंडूत 37 धावा केल्या. हार्दिक पांड्याला सामनावीर पुरस्कार देण्यात

आला. या परभवानंतर बांगलादेश स्पर्धेतून बाहेर पडला आहे. तर भारत उपांत्य फेरीत दाखल झाला आहे.

**हवामान**

कोकण, मध्य-महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी  वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण किनारपट्टीवर तुरळक ठिकाणी अतिवृष्टी आणि जोराचे वारे वाहण्याचा अंदाज आहे तसंच विदर्भातही जोराच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. रत्नागिरी जिल्ह्याला पिवळा बावटा तर सिंधुदुर्ग जिल्ह्याला नारिंगी बावटा जारी करण्यात आला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**